## नि. दि. दा. क्र. १६५/२०१८ मधील नि. ४९ वरील आदेश
## (चंपाबाई पांडुरंग देसाई वि. अहिल्याबाई कृष्णांत कदम )

१. प्रस्तुतच्या अर्जाअन्वये वादी यांनी प्रतिवादीचे वारस रेकॉर्डवर घेणेकरीता झालेला विलंब माफ होणेकरीता विनंती केली आहे.

२. वादीच्या अर्जामधील कथन असे की, वादीने सदरचा दावा सरस निरस मानाने वाटपाकरीता, पृथक कब्जाकरीता, हक्कज्ञापनाकरीता व निरंतर मनाईकरीता दाखल केला आहे. दाव्यातील प्रतिवादी नं. १ श्रीमती अहिल्याबाई कृष्णांत कदम या दि.०३/१०/२०१८ रोजी भद्रावती येथे मयत झाले आहेत. त्यांना असलेले सरळ व कायदेशीर वारस रेकॉर्डवर घेणेकरीताचा अर्ज वादी यांनी नि. ५० कडे दि. २३/०१/२०१९ रोजी दाखल केलेला आहे.वादीने नमूद केलेल्या कारणानुसार वादीस प्रतिवादी मयत झालेबाबतची माहिती वेळेत मिळाली नसल्याने तसेच काही वारस हे परराज्यात राहण्यास असल्यामुळे त्यांची नावे व पत्ते देखिल वेळेत मिळाले नसल्यामुळे वादीस मुदतीत वारस रेकॉर्डवर घेता आले नाही. त्या कारणामुळे वादीला २१ दिवसांचा विलंब झाला आहे त्यामुळे वादीने सदर विलंब माफ होवून वारस रेकॉर्डवर घेणेबाबत विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी नि. ४९ च्या पाठीमागे स्वतःचे म्हणणे दाखल करून अर्जास विरोध दर्शविलेला आहे. त्यांच्या मते अर्जामधील कारण हे खोटे व चुकीचे आहे. प्रतिवादी नं. १ मयत होवून मुदतीत त्यांचे वारस रेकॉर्डवर घेतले नसल्यामुळे सदरचे काम आपोआप अबेट होते. त्यामुळे वादीने अबेटमेंट सेट असाईड करण्याची विनंती न करता केवळ विलंब माफीची मागणी केली आहे. सबब प्रतिवादीचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादीच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

५. अर्ज वाचला. अर्जामधील कथने वादीनी शपथेवर सांगितलेली आहेत. दाव्यातील रेकॉर्ड तपासले. वादी यांनी नि. ५३/१ ला मयत प्रतिवादी नं. १ अहिल्याबाई कदम हिचे मृत्यूप्रमाणपत्र दाखल केले आहे. सदरचे मृत्यूप्रमाणपत्र वादीला दि.

१७/१०/२०१८ इ. रोजी मिळाले असल्याचे दिसते. मृत्युप्रमाणपत्राचे अनुषंगाने वादीला कायदयानुसार प्राप्त झालेले ९० दिवस संपल्यानंतर वादीला मयत प्रतिवादी नं. १ चे वारस रेकॉर्डवर घेण्याकरीता १४ दिवसांचा विलंब झाल्याचे दिसते. सदरचा विलंब हा वादी यांना प्रतिवादी मयत झालेबाबतची माहिती वेळेत मिळाली नसल्यामुळे व त्यांचे काही वारस हे परराज्यात राहण्यास असल्यामुळे त्यांची नावे व पत्ते देखिल वेळेत मिळाले नसल्यामुळे वादीस मुदतीत वारस रेकॉर्डवर घेता आले नसल्याचे वादीने शपथेवर कथन केले आहे. वादी यांनी दिलेली मयत प्रतिवादी नं. १ च्या वारसांची नावे व पत्ते पाहिली असता ते वेगवेगळया ठिकाणी राहतात हे सप्ष्ट दिसते. त्यामुळे वादीने नमूद केलेले कारण योग्य वाटते. दावा हा वाटपाकरीता, पृथक कब्जाकरीता, हक्कज्ञापनाकरीता व निरंतर मनाईकरीता असल्याने मयत प्रतिवादी नं. १ च्या पश्चात दावेचे कारण तिच्या वारसांच्या वतीने Survive (जीवंत) होते. दि.प्र.सं. आदेश २२ रुल ४ प्रमाणे दावेचे cause of action मयत प्रतिवादीच्या वारसांच्या वतीने जीवंत राहत असेल तर त्या वारसांना दावेचे कामी पक्षकार करणे कायदयाने आवश्यक आहे. सदर वारसांना रेकॉर्डवर घेतलेस दावेतील वादप्रनाचे गुणावगुणावर निर्गती होणेस न्यायालयास मदत होणार असून त्यामुळे प्रतिवादीचे कसलेही नूकसान होणार नाही त्यामुळे वादीचा अर्ज रक्कम रु. २००/– चा खर्च भरणेच्या अटीवर मंजूर करणे मला न्यायाचे वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. वादीचा अर्ज रक्कम रु.२००/– (अक्षरी रु. दोनशे मात्र) चा खर्च भरणेच्या अटीवर मंजूर करणेत येत आहे.

२. वादीनी वरिल खर्च प्रतिवादी यांना पुढील तारखेदिवशी अगर तारखेपूर्वी देणेचा आहे. या अटीची पूर्तता न झालेस वादी विरुध्द योग्य ते आदेश पारित होतील.

स्वाक्षरीत/–

मिरज. ( यु. पी. कोळी )

दि. १५/०६/२०१९ २रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मिरज.